सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ E-mail : gcoeara@gmail.com Web-Site : www.gcoeara.ac.in

(स्वयंचल व यंत्र अभियांत्रिकी अभ्यासक्रम एनबीए, नवी दिल्ली मानांकित)

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२४/ 4222 दि. 12 DEC 2024

## विद्यार्थ्यासाठी महत्वाची सुचना

संदर्भ-:1. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे परिपत्रक क्र ३७४० दि.२३/११/२०२४

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात आल्याप्रमाणे या महाविद्यालयातील चालु शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये प्रथम/ द्वितीय/तृतीय व चतुर्थ वर्ष (FE/SE/TE/BE All Branches) मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिटाकडून शैक्षणिक वर्ष 2024-25 पासुन प्रथम व थेट द्वितीय वर्षास प्रो-राटा ( Pro-Rata) शुल्कात (Fee) रूपये ३१४/- वरून रूपये ३४०/- (अक्षरी रूपये तिनशे चाळीस फक्त) व द्वितीय/तृतीय व चतुर्थ वर्षास रूपये ३०४/- वरू रूपये ३२०/- (अक्षरी रूपये तिनशे विस फक्त ) इतकी वाढ करण्यात आलेली आहे.

त्यामुळे प्रथम व थेट द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांनी फरकाची रक्कम रूपये २६/- (अक्षरी रूपये सव्वीस फक्त) व द्वितीय / तृतीय व चतुर्थ वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांनी फरकाची रक्कम रुपये १६/- (अक्षरी रूपये सोळा फक्त) त्वरीत दिनांक २४/१२/२०२४ पर्यंत SBI Collect वर Admission Fees for FE/SE/TE/BE मध्ये जावून (Uni. Pro-Rata) या रकान्यात भरून त्याची पावती (Receipt) कार्यालयातील विद्यार्थी विभाग तसेच रोखपाल यांच्याकडे दोन प्रती मध्ये जमा करण्यात यावी.

तसेच द्वितीय/तृतीय व चतुर्थ वर्ष SE/TE/BE मध्ये तात्पुरता प्रवेश घेतलेल्या ज्या काही संबंधित विद्यार्थ्यांनी १०% प्रवेश शुल्कापोटी ३०४/- रूपये भरून तात्पुरता (Provisional) प्रवेश घेतलेला आहे. अशा संबंधित विद्यार्थ्यांनी उर्वरीत रुपये १६/- (अक्षरी रूपये सोळा फक्त) (Uni. Pro-Rata) शुल्क (Fee) SBI Collect वर भरुन त्याची पावती विद्यार्थी विभाग व रोखपाल यांच्याकडे दोन प्रती मध्ये जमा करावी.

तरी महाविद्यालयातील सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने दिलेल्या मुदतीत म्हणजेच दिनांक २४/१२/२०२४ रोजीपर्यंत प्रो-राटा (Uni. Pro-Rata) शुल्क (Fee) SBI Collect वर त्वरीत भरावे. अन्यथा भविष्यात होणाऱ्या शैक्षणिक व आर्थिक नुकसानिस संबंधित विद्यार्थी स्वतः जबाबदार असेल याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. तसेच उर्वरित (Uni. Pro-Rata) न भरलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल विद्यापीठाकडून न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील याची नोंद घ्यावी.

12-12-24

(डॉ. दि.रा.पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ता.आंबेगाव जि.पुणे

प्रत-1.विभागप्रमुख- अणुविद्युत/ उपकरणीकरण /संगणक /स्वयंचल / स्थापत्य /यंत्र /उपयोजित /कर्मशाळा यांनी सदर सुचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून तसे सुचित करावे व What,s App ग्रुप वर पाठवावी व नोटीस बोर्डवर लावावी
2. डी.पी.यु.यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी. संकेतस्थळावर प्रदर्शित करावी.